तरूण भारत

# महाविद्यालयांना मिळणार प्रोत्साहनपर निधी

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांना प्रोत्साहनपर निधी दिला जाणार आहे. यामध्ये रौप्यमहोत्सवी अडीच लाख, सुवर्ण महोत्सवी पाच लाख, हिरक महोत्सवी सहा लाख, अमृत महोत्सवी साडेसात लाख, शतक महोत्सवी वर्षात पदार्पण १० लाख रूपये देण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. विद्यापीठात झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

शिवाजी विद्यापीठातील अधिविभागात सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संगणक केंद्रात इंटर्नशिपसाठी मान्यता देण्यात आली. इंटर्नशिपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कामाचा अनुभव मिळेलच परंतू केलेल्या कामाचे प्रशस्तीपत्रकही मिळणार आहे. त्यामुळे पदवी घेतल्यानंतर लगेच विद्यार्थ्यांना



- शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता

रोजगाराची संधी मिळणार आहे. शिवाजी विद्यापीठाला देणगी द्यावयाची असेल तर ३ लाख रूपयांच्यापुढे रक्कम असली पाहिजे, असा पुर्वी नियम होता. त्यामुळे हा निर्णय अनेकांसाठी अडचणीचा ठरत होता. त्यामुळे येथूनपुढे १ लाख रूपये देणगी स्विकारण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे. या बैठकीला व्यवस्थापन परिषदेचे सदस्य ॲड. धैर्यशील पाटील, अमित कुलकर्णी, डॉ. कणसे, डॉ. आर. के. कामत, डॉ. योजना जुगळे, डॉ. गुळवणी आदी उपस्थित होते.

पुढारी

# लस न घेतलेल्यांनाही कॉलेजमध्ये प्रवेश

**मुंबई :** राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अंतर्गत येणारी विद्यापीठे, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे वर्ग ऑफलाईन पद्धतीने सुरु करावीत असे आदेश बुधवारी दिले आहे. या निर्णयामुळे महाविद्यालयाबरोबरच विद्यापीठांची कॅम्पस पुन्हा एकदा गजबजणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी ट्विट करत ही माहिती दिली. लसींच्या दोन मात्रा न घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात यापूर्वी प्रवेश नव्हता आता ही अट रद्द केली आहे.

पुढारी

# विद्यापीठाकडून ३८९ ऑनलाईन परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने हिवाळी सत्र परीक्षेअंतर्गत आजअखेर झालेल्या सुमारे ३८९ परीक्षांचे ऑनलाईन निकाल जाहीर केले आहेत. परीक्षा विभागाकडून विद्यापीठ स्तरावरील ३६२ परीक्षांना १४ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली आहे. परीक्षा होतील तसे निकाल घोषित केले जात आहेत. ५ एप्रिलला एम. ए., एम. टेक., एमबीए, बीएस्सी बीएड आदी १२ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. मंगळवारी बीटेक, बीएस्सी, एमस्सी आदी ९ शाखांच्या परीक्षा झाल्या, अशी माहिती जी. आर. पळसे यांनी दिली.

लोकमत

# कोरोना लस तयार करण्यात विद्यापीठाचेही योगदान

## पी. एस. पाटील : कोतोली येथे चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**करंजफेण :** कोरोना महामारीमुळे संपूर्ण जग थांबले होते, तेव्हा शिवाजी विद्यापीठामधील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थ्यांनी या संसार्गावर संशोधन करून लस तयार करण्यामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. अमेरिकन व भारतीय कंपन्यांनी एक ते तीन कोटींपर्यंत निधी उपलब्ध करून दिला. त्यातून लस निर्माण केली व इतरही नावीन्यपूर्ण प्रकल्प राबविले. हे जगभर स्वीकारले गेले.

कोरोना प्रतिबंधक स्प्रेची निर्मिती भौतिकशास्त्रच्या विद्यार्थ्यांनी करून कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमध्येदेखील नावलौकिक मिळविला. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाला अनेक पुरस्कार मिळाले, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्ट्स अँड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली, (ता. पन्हाळा) येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, सायन्स विभाग येथे या विषयावर आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक डॉ. अजय चौगुले होते. यावेळी चार चर्चासत्रे झाली. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. ए. एम. गुरव यांनी मार्गदर्शन केले.

चर्चासत्राच्या चौथ्या सत्रात एकूण ७४ शिक्षक, संशोधक, विद्यार्थी - विद्यार्थिनींनी संशोधन पेपरचे वाचन केले. शिवाजीराव पाटील, संचालक वेदिका चौगुले, प्र. प्राचार्य डॉ. व्ही. पी. पाटील, आदी उपस्थित होते.

0 7 APR 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संत विचारच दिशादर्शक

## परिसंवादातील सूर : संत साहित्यातून प्रस्थापितांविरोधात बंडाची प्रेरणाही

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : काळ कुठलाही असो अस्वस्थतेची सूत्रं ठरलेली असतात. किंबहुना अस्वस्थता एक युगधर्म आहे. तो सर्व काळांना लागू होतो. अस्वस्थ वर्तमानाचा विचार केला तर समाजाला संत विचारांची भूमिकाच खऱ्या अर्थाने तारू शकते, असा सूर पहिल्या विश्वात्मक संत साहित्य संमेलनात आज झालेल्या परिसंवादातून उमटला. महासैनिक दरबार हॉलमध्ये झालेल्या या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. 'अस्वस्थ वर्तमानात संत विचारांची भूमिका' असा परिसंवादाचा विषय होता. दरम्यान, संत साहित्यातून प्रस्थापितांविरोधात बंडाची प्रेरणाही मिळते आणि नव्या पिढीने संत विचार आत्मसात करणे, ही काळाची गरज असल्याचेही परिसंवादातील वक्त्यांनी आवर्जून सांगितले.

सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार म्हणाले,



कोल्हापूर : पहिल्या विश्वात्मक संत साहित्य संमेलनात परिसंवादावेळी सकाळ माध्यम समूहाचे संपादक संचालक श्रीराम पवार यांचा सत्कार करताना संमेलनाध्यक्ष डॉ. मदन महाराज गोसावी. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मोहन गोस्वामी-तिवारी आदी.

''काळ कुठलाही असो अस्वस्थतेचे पदर त्यातून प्रकर्षाने दिसतात. वर्तमानाचा विचार केला तर एका जीवघेण्या स्पर्धेला सर्वांनाच सामोरे जावे लागत आहे. एखाद्या चाकाला बांधल्यासारखे सारेच जण पळतो आहे आणि सोबत पुढच्या पिढीलाही धावायला लावतो आहे. स्वतः पुढं जाण्यासाठी कुणाला तरी मागं सारण्याच्या स्पर्धेतील अस्वस्थतेने साऱ्यांचेच जगणं बदलून गेले आहे. मुळात अस्वस्थतेच्या मुळाशी मोह आणि भय असते आणि ती कधीही न संपणारी असते. त्यातून बाहेर पडण्यासाठी अस्सल भारतीय तत्त्वज्ञान, संत विचारांची कासच मोलाची ठरते. एकापाठोपाठ एक येणाऱ्या इच्छांच्या निर्मितीतून मुक्तता आणि आत्मशोधाचा प्रवास करताना संत विचार दिशादर्शक ठरतात. सध्या समाजात दुही पसरवण्याचा एक मोठा प्रवाह कार्यरत असताना आता संत विचारातून त्यावर मात करणे शक्य होणार आहे.''

डॉ. भूषण स्वामी यांनी मनाच्या विविध व्याधींतून मुक्त होण्यासाठी संत विचार आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. आपल्या इच्छा संपत नाहीत म्हणून वेदना होतात आणि भौतिक साधनांच्या मागे किती लागायचे, याचा विचार आता प्रत्येकाने केलाच पाहिजे, असेही ते म्हणाले. डॉ. अवतार सिंग यांनी मॉब लिचिंग अर्थात झुंड बळी, लव्ह जिहाद, गायीच्या नावावर होणारी हिंसा, जबरदस्तीने धर्मांतराचे प्रकार आदी गोष्टी वर्तमानातील अस्वस्थतेची कारणे असून, संत विचारांतूनच त्यावर मात करता येईल, असे सांगितले. डॉ. रवींद्र ठाकूर यांनी 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' ही शिकवण विस्तृतपणे मांडताना विश्वकल्याणासाठीच्या संत विचारांचा वेध घेतला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अध्यक्षीय समारोप केला.

ते म्हणाले, ''प्रत्येक काळात अस्वस्थतेचे पर्व आले आणि त्यावर विविध माध्यमांतून मात करताना संत विचार उपयुक्त ठरले. वर्तमानाचा विचार केला तर आता जगभरात हॅप्पीनेस इंडेक्स जाहीर करण्याची नवी पद्धत आली आहे. म्हणजेच आपण दुसऱ्यापेक्षा किती आनंदी आहे, हे मोजतानाही आपण एका वेगळ्याच अस्वस्थतेत गुंतून जात आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर संत विचारांसारखे दुसरे प्रभावी औषध नाही. मानवतेचा धर्म प्रत्येकानेच जगायला हवा. येत्या काळात मूल्यशिक्षणात संत साहित्याचा समावेश करण्यावर भर देण्याची गरज असून त्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.''

दरम्यान, संमेलनाध्यक्ष डॉ. मदन महाराज गोसावी यांच्या हस्ते सर्व वक्त्यांचे स्वागत झाले. प्रा. डॉ. शिवाजीराव हुसे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दिलीप बारुटे यांनी आभार मानले.

07 APR 2022

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेतून विद्यार्थ्यांनी प्रगती करावी

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे आवाहन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर** : छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र विलक्षण प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळेच आजचे आपले अस्तित्व आहे, याचे भान राखून विद्यार्थ्यांनी त्यांचे स्मरण करून उन्नती साधावी, असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी येथे केले.



राष्ट्रपतींचे सुवर्णपदक ऐश्वर्या मोरे या विद्यार्थिनीस कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी प्रदान केले. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील.

शिवाजी विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षान्त समारंभात घोषित करण्यात आलेली पारितोषिके कुलपती कोश्यारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. ते म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नगरीत शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव आणि देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव असा योग जुळून आला आहे, ही महत्त्वाची बाब आहे. कोविडच्या काळात शैक्षणिक बाबतीत पडलेला खंड आता विद्यार्थी-शिक्षकांनी दुप्पट मेहनतीने भरून काढण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा अहवाल कोश्यारी यांच्यासमोर सादर केला. ऐश्वर्या आकाराम मोरे या विद्यार्थिनीस राष्ट्रपती सुवर्णपदक, स्वाती गुंडू पाटील या विद्यार्थिनीस कुलपती सुवर्णपदक कोश्यारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. नंदिनी पाटील व सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.